# प्रकरण १ ले

# प्रस्तावना व संकल्पना : जलस्वराज्य प्रकल्प

## १.१ प्रस्तावना :

शुद्ध पाणी स्वच्छ गाव हे ध्येय असलेला, ग्रामीण भागातील पाणी टंचाई दूर करणारा जलस्वराज्य हा प्रकल्प २००२ मध्ये महाराष्ट्रात सुरु झाला. जलस्वराज्य प्रकल्पाचा मुख्य उद्देश पिण्याच्या पाण्याचा तुटवडा असणाऱ्या गावांना, टंचाईग्रस्त खेडयांना शुद्ध व स्वच्छ पाणीपुरवठा करणे, प्रत्येक व्यक्तीला रोज किमान ४० लिटर पाणीपुरवठा करणे हा आहे. जागतिक बॅंकेने केलेल्या अर्थसहाय्याच्या माध्यमातून महाराष्ट्र शासनाने ग्रामीण भागाच्या विकासासाठी जलस्वराज्य प्रकल्प सुरु केला आहे. शुद्ध व स्वच्छ पाणीपुरवठयाबरोबरच गावाची स्वच्छता, लोकसहभाग, महिला सक्षमीकरण, लोकांचा सर्वांगिण विकास या घटकांना या प्रकल्पात महत्व आहे. महाराष्ट्रातील २६ जिल्हयात हा प्रकल्प सुरु आहे. 'जलस्वराज्य प्रकल्पातून विकास : रेंदाळ गावचा विशेष अभ्यास' या लघुप्रंबधाच्या अभ्यासातून जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून गावाचा पाणी प्रश्न कशा प्रकारे सुटला, लोकसहभागातून विकासाला कशा प्रकारे चालना मिळाली हे समजण्यास मदत होईल. त्यामुळे या अभ्यासाचे महत्व वाटते.

## १.२ जलस्वराज्य प्रकल्पाची पार्श्वभूमी :

" महाराष्ट्र शासनाने स्वातंत्र्यानंतर विशेषत: १९६० पासून ग्रामीण भागाचा पाणी प्रश्न सोडविण्यासाठी विविध योजना आखल्या. १९६० नंतर सुमारे १६,५०० कोटी रुपये ग्रामीण भागातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी नळपाणीपुरवठा योजनांवर खर्च करण्यात आले."१ परंतु विविध कारणांमुळे या योजना यशस्वी ठरु शकल्या नाहीत. ग्रामीण भागात तीव्रतेने पाणी टंचाई जाणवत राहिली. योजना अयशस्वी होण्याचे प्रमुख कारण म्हणजे शासकीय योजना लोकांना कधी आपल्या वाटल्या नाहीत. आपलेपणाचा अभाव हे या

योजना अयशस्वी होण्याचे प्रमुख्र कारण ठरले. पाण्याचा अयोग्य वापर, विजबिलाची थकबाकी, छोटया मोठया दुरुस्त्यांसाठी शासकीय मदतीची वाट पाहणे, पाणीपुरवठा योजनेच्या साहित्यांची चोरी करणे अशी अनेक कारणे त्यासाठी जबाबदार आहेत. "शासन जनतेच्या विकासासाठी राबवत असलेल्या योजना ज्यावेळी लोकांना आपल्या वाटतील तेव्हाच या योजना यशस्वी होतील असे सर्व्हेक्षणात शासनाच्या लक्षात आले. २२ जुलै २००२ रोजी शासनाने लोकसहभागातून विकास ही नवीन संकल्पना मांडली."२ त्याप्रमाणे ग्रामीण भागाचा अभ्यास करुन पाणीपुरवठा योजनेचा आराखडा तयार करुन तो जागतिक बँकेला सादर करुन निधी मंजूर करुन घेण्यात आला. त्यातून २००२ साली 'शुद्ध पाणी , स्वच्छ गाव' हे ब्रिदवाक्य असलेला राज्यातील ग्रामीण जनतेसाठी जनतेने राबवायचा जलस्वराज्य प्रकल्प सुरु करण्यात आला.

## १.३ जलस्वराज्य प्रकल्पाचे स्वरुप :

ग्रामीण भागातील जनतेला पाण्यासाठी वणवण भटकावे लागू नये, पाणी टंचाई नेहमीची दूर व्हावी, ग्रामीण भागात शुद्ध पाण्याच्या बाबतीत स्वराज्य अवतरावे या उद्देशाने या प्रकल्पाला जलस्वराज्य प्रकल्प असे नाव देण्यात आले. २००२ साली महाराष्ट्रातील ठाणे, उस्मानाबाद आणि सातारा या तीन जिल्हयासाठी जलस्वराज्य प्रकल्प प्रायोगिक तत्वावर सुरु करण्यात आला. जलस्वराज्यचे यश अपयश अभ्यासण्यासाठी प्रायोगिक तत्वावर या तीन जिल्हयातील प्रत्येकी २५ याप्रमाणे ७५ ग्रामपंचायतींची निवड करण्यात आली. या ग्रामपंचायतींमध्ये आलेले अनुभव, ग्रामस्थांची मते यांचा विचार करुन पुढील ग्रामपंचायतींचा आराखडा ठरविण्यात आला. प्रायोगिक स्तरावर निवडलेल्या ग्रामपंचायतीमधील प्रकल्पाच्या यशावर महाराष्ट्रातील उर्वरित जिल्हयासांठी जलस्वराज्य प्रकल्प पुढे सुरु करण्यात आला. सप्टेंबर २००५ पासून महाराष्ट्रातील २६ जिल्हायातील ३०४४ ग्रामपंचायतींमध्ये जलस्वराज्य प्रकल्प सुरु झाला आहे.

जलस्वराज्य प्रकल्पात जिल्हयातील सर्व ग्रामपंचायतींची निवड करण्यात येत नाही. ज्या गावांना स्वत:हून प्रकल्पामध्ये सहभागी व्हायचे आहे त्यांना जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर जिल्हा परिषदेकडे अर्ज करावा लागतो. शासनाच्या नियम व निकषांनुसार जी गावे या प्रकल्पासाठी योग्य आहेत अशा गावांची निवड केली जाते. ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, सामाजिक लेखा समिती व महिला विकास समिती अशा तीन समित्यांची निवड करुन त्यांच्यामध्ये कामाची विभागणी करण्यात आली आहे. कामाच्या सोयीसाठी जलस्वराज्य प्रकल्पाचे उपप्रकल्प १,२,३ असे उपविभाग तयार करण्यात आले आहेत. ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती उपप्रकल्प १ ( क्षमता बांधणी ) व उपप्रकल्प २ चे ( नळपाणीपुरवठा व स्वच्छता ) काम पाहते. महिला विकास समिती उपप्रकल्प ३ म्हणजेच महिला सक्षमीकरणाचे काम पाहते. दोन्ही समित्यांनी केलेल्या कामांच्या आर्थिक व्यवहारांवर देखरेख व नियंत्रण ठेवण्याचे काम सामाजिक लेखा समिती करते. तीनही समित्यांमध्ये ५०% महिलांचा सहभाग आवश्यक आहे. पाणीपुरवठा योजनेसाठी लागणारे तांत्रिक सेवा पुरवठादार, ठेकेदार, गावाला सहाय्य करण्यासाठी आवश्यक असणारी सहाय्यकारी संस्था यांची निवड महिला व सर्वसाधारण ग्रामसभेद्वारे ग्रामस्थ करतात. सर्व कामकाजावर नियंत्रण ठेवण्याचे व मुल्यमापण करण्याचे काम जिल्हा चमू करतो. पाणी व स्वच्छता हे दोन्ही घटक महिलांशी निगडीत असल्यामुळे महिलांचा सहभाग, त्यांचे नेतृत्व यांना प्रकल्पात विशेष महत्व आहे.

जलस्वराज्य प्रकल्प हा जागतिक बॅंक अर्थसहाय्यीत प्रकल्प आहे. जागतिक बॅंकेकडून निधी प्रथम केंद्र सरकारला दिला जातो. केंद्र सरकारकडून तो राज्य सरकारला दिला जातो. तेथून जिल्हा परिषदेकडे येतो. जिल्हा स्तरावरुन गावस्तरावर त्याचे वितरण केले जाते. उपप्रकल्प १ व २ साठी दिला जाणारा निधी ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समितीच्या खात्यावर जमा होतो. उपप्रकल्प ३ साठी दिला जाणारा निधी महिला विकास समितीच्या खात्यावर जमा होतो. प्रमुख तीन समित्यांना मदत करण्यासाठी देखरेख, खरेदी व हिशोब अशा तीन उपसमित्या असतात.

जिल्हा स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी हे प्रकल्प संचालक असतात. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रकल्प समन्वयक म्हणून काम पाहतात. याशिवाय जिल्हा

सुलभीकरण गट, जिल्हा आर्थिक व्यवस्थापन गट, जिल्हा मुल्यांकन व सनियंत्रण गट अशा तीन गटांमार्फत जलस्वराज्य प्रकल्पाचे कामकाज चालते. जिल्हा चमू गावाला मार्गदर्शन करण्याचे व कामकाजाचे मूल्यमापन करुन त्यावर नियंत्रण ठेवण्याचे काम करतो.

## १.४ जलस्वराज्य प्रकल्पाचे नियम :

जलस्वराज्यचे उद्देश साध्य करण्यासाठी व प्रकल्पाचा निधी मिळवण्यासाठी पुढील नियम महत्वाचे आहेत.

१) निर्णय प्रक्रियेत सहभाग

२) पारदर्शक कारभार

३) आपली मालकी, आपली जबाबदारी

४) समाजातील सर्व घटकांचा समावेश

५) आर्थिक जबाबदारी सांभाळणे

## १.५ जलस्वराज्य प्रकल्प, उद्देश व गरज :

१) "प्रत्येक गावाला व गावातल्या प्रत्येकाला शुध्द व पुरेसे पाणी सातत्याने, समुहशक्तीतून प्राप्त व्हावे.

२) स्वच्छ ग्रामपरिसर, निर्मळ शरीर व आरोग्यदायी जीवन यासाठी आवश्यक सुविधा, माहिती व कौशल्ये उपलब्ध करुन देणे.

३) जल आणि स्वच्छतेच्या लोकाभिमुख प्रकल्प अंमलबजावणीतून इतर ग्रामस्तरीय मुलभूत सुविधा स्वप्रयत्नातून प्राप्त करुन घेण्याची गावाला सवय लागावी.

४) प्रत्येकाचे म्हणणे ऐकले जाईल अशा संस्था गावांमध्ये विकसित करणे आणि प्रत्येकाला खास करुन गरीब लोकांना निर्णय प्रक्रियेत समाविष्ट करुन घेणे.

५) प्रकल्पात महिलांना सहभागी करुन घेऊन त्यांचे सक्षमीकरण करणे. पाणी, स्वच्छता व महिला सक्षमीकरण यावर स्वत:चे विचार व मते मांडण्यासाठी महिला ग्रामसभा घेणे, महिलांची क्षमता बांधणी करणे.

६) वैयक्तिक, घरगुती व परिसर स्वच्छता सवयींमध्ये बदल करुन गावांतील लोकांचे आरोग्य सुधारणे.

७) वाडया वस्तीवरील लोकांना पाणी व स्वच्छता तसेच विकासाच्या इतर संधी मिळण्यासाठी सक्षम करणे."३

भारतात साधारणत: चार महिने पाऊस पडतो. महाराष्ट्रातही भौगोलिक रचनेवर पावसाचे प्रमाण अवलंबून आहे. महाराष्ट्रात स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण पाणीपुरवठयासाठी राबविण्यात आलेल्या विविध योजनांवर १६,६०० कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. आपलेपणाच्या अभावामुळे या योजना यशस्वी होऊ शकल्या नाहीत. त्यामुळे पिण्याचा पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी खर्च करण्यात आलेली कोटयावधी रुपयांची रक्कम पाण्यात गेली. ग्रामीण भाग तहानलेलाच राहिला, त्यांची पाण्यासाठीची वणवण थांबली नाही. पाण्यासाठी आंदोलने, मोर्चे, घेराव, मारामारी, हिंसाचार हे प्रकार स्वातंत्र्याच्या ५५ वर्षानंतरही नित्याचेच झाले. यावर उपाय म्हणून २००२ पासून राज्य शासनाने जागतिक बॅंकेच्या मदतीने शुद्ध व स्वच्छ पाणी पुरवठयासाठी जलस्वराज्य प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेतला. महाराष्ट्रातील २६ जिल्हयातील ३०४४ ग्रामपंचयातींसाठी १३५० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

पाणी हा प्रत्येक घरातील महिलांचा जिव्हाळ्याचा विषय असल्यामुळे पाणीपुरवठयाची कोणतीही योजना महिलांना वगळून यशस्वी ठरणार नाही हे शासनाच्या लक्षात आल्यामुळे या प्रकल्पात महिलांच्या ५०% सहभागाला, त्यांच्या निर्णयाला आणि नेतृत्वाला महत्व देण्यात आले आहे. महिला सक्षमीकरणासाठी त्यांच्याशी संवाद साधणे, त्यांची मानसिकता बदलून बदल स्विकारण्यास भाग



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

पाडणे, त्यांच्यात नेतृत्वगुण विकसित करणे, महिलांना सामाजिक व आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविणे हे काम जलस्वराज्यच्या माध्यमातून होत आहे.

## १.६ जलस्वराज्य प्रकल्पासंदर्भातील अटी :

१) "जलस्वराज्य प्रकल्पासंदर्भातील सर्व निर्णय महिला व सर्वसाधारण ग्रामसभेत घेणे आवश्यक आहे.

२) ग्रामसभेने ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती व सामाजिक लेखा परिक्षण समितीला दिलेले अधिकार त्या समित्यांनी योग्य पद्धतीने वापरले नाहीत तर त्यावर सनियंत्रण ठेवून कोणताही हलगर्जीपणा ग्रामसभेच्या समोर मांडणे ही ग्रामपंचायतींची जबाबदारी राहील.

३) एखादा निर्णय निवडण्यासाठी तो देखभाल दुरुस्ती आणि भांडवली किंमतींच्या दृष्टीने सर्वात किफायतशीर असला पाहिजे.

४) जलस्वराज्य प्रकल्पात परंपरागत उतरंड नाही. सर्वांनी समूहाच्या भल्यासाठी काम करणे आवश्यक आहे.

५) जलस्वराज्य प्रकल्पाविषयी सर्व माहिती आणि कागदपत्रे जनतेच्या माहितीसाठी प्रकल्पाच्या सर्व स्तरांवर सदैव उपलब्ध केली गेली पाहिजेत.

६) गावातील एकूण उपलब्ध पाणी, त्यात विविध उपायांद्वारे होऊ शकणारी वाढ यांचा विचार करुन गावाच्या पाण्याचे संवर्धन, हिशोब, वापर व वाटप यांचे एकत्रित नियोजन ग्रामस्थांनी ग्रामस्तरावर ग्रामसभेच्या माध्यमातून करुन ते अमंलात आणले पाहिजे.

७) जलस्वराज्य प्रकल्पातून आकाराला येणाऱ्या नळपाणीपुरवठा योजनेतून गावातील प्रत्येकाला दर दिवशी किमान ४० लिटर पाणी मिळेल यादृष्टीने ती राबवायची आहे.

८) ४० लिटर्स दरडोई दर दिवशी पेक्षा जास्त पाणी गावास हवे असल्यास अशा ४० लिटर्सपेक्षा जादा सुविधांच्या खर्चाची जबाबदारी गावकऱ्यांना उचलावी लागेल.

९) महिला या जलस्वराज्य प्रकल्पातील सर्वात महत्वाचा घटक आहेत. त्यामुळे प्रत्येक सर्वसाधारण ग्रामसभेपूर्वी महिला ग्रामसभा होणे अनिवार्य आहे.

१०) ग्रामस्तरावरील सर्व समित्या ग्रामपंचायतीच्या सर्वसाधारण नियंत्रणाखाली असतील परंतु अंतिमत: ग्रामसभेस उत्तरदायी राहतील.

११) सामाजिक लेखा समिती ग्रामसभेच्या वतीने प्रकल्पाच्या आर्थिक कामकाजावर लक्ष ठेवेल.

१२) पाणी पुरवठा व स्वच्छताविषयक सर्व सार्वजनिक सोयीसुविधा ग्राम पंचायतीच्या मालकीच्या राहतील व ग्राम पाणी पुरवठा स्वच्छता समितीच्या माध्यमातून ग्रामसमूह त्यांचे व्यवस्थापन करेल व समूहाचे त्यांच्यावर नियंत्रण राहील."४

**अ) ग्रामपंचायत निवडीचे निकष :**

| अ.क्र. | निकष | गुण |
|---|---|---|
| १ | सध्याची पाणी उपलब्धता | २५ गुण |
| २ | पाणी टंचाईमुळे टॅंकर लावावी लागणारी गावे | १० गुण |
| ३ | पाणी प्रत (नैसर्गिक व मानव निर्मित ) | २५ गुण |
| ४ | दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण | ५ गुण |
| ५ | मागासवर्गीय लोकसंख्या प्रमाण | १० गुण |
| ६ | आदिवासी लोकसंख्या प्रमाण | १० गुण |
| ७ | गावातील पूर्वीची पाणीपट्टी वसूली | ५ गुण |
| ८ | संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाअंतर्गत बक्षीस मिळाले असल्यास | ५ गुण |
| ९ | भूजल कायदा व पाणीवाटपाबाबत गाव सहभाग | ५ गुण |

## १.७ गावस्तावर प्रकल्प अमंलबजावणीचा कालावधी :

जलस्वराज्य प्रकल्प हा १८ महिन्यात राबवायचा आहे असा नियम आहे.

१) पूर्वनियोजन :- ग्रामस्तरावरील प्राथमिक जाणीव जागृती व क्षमता बांधणीसाठी ३ महिने

२) सुविधांसाठी नियोजन :- स्त्रोत निश्चिती, तांत्रिक पर्याय निश्चिती, योजना नियोजन, प्राकलने व आराखडे, अमंलबजावणी, मालखरेदी नियोजन, निविदा, आवश्यक प्रशिक्षण व जबाबदारी निश्चितीकरण - ६ महिने

३) देखभाल दुरुस्ती :- सुविधा चाचणी, अंतिम लेखे, सामाजिक लेखा परिक्षण, देखभाल व दुरुस्तीचे नियोजन.

४) सुविधांचे प्रत्यक्ष बांधकाम ( अमंलबजावणी ) :- सुविधा व उपाययोजनांची प्रत्यक्ष उभारणी .

### अ) प्रकल्पासाठी एकूण निधी उपलब्धता :

१) अंदाजे रु. २५०० कोटी (दोन्ही टप्पे धरुन)

२) लोकसहभागातून करण्यात येणाऱ्या अमंलबजावणीमुळे रु.३५०० कोटींपर्यत कामे होऊ शकतात.

३) सध्या मंजूर प्रकल्प निधी :- १३५० कोटी रु.

करारनामा होण्यापूर्वीच ९ जिल्हयात जलस्वराज्य प्रकल्प सुरु करण्यास मान्यता देण्यात आली. महाराष्ट्रातील जनतेवर जागतिक बॅंकेने टाकलेल्या विश्वासाचे हे प्रतिक आहे.

## १.८ महाराष्ट्र राज्यातील जलस्वराज्य प्रकल्प :

शुद्ध पाणी, स्वच्छ गाव हे ध्येय असलेला, राज्यातील ग्रामीण जनतेसाठी, जनतेने राबवायचा प्रकल्प म्हणजे जलस्वराज्य प्रकल्प होय. "२००२ मध्ये उस्मानाबाद, सातारा व ठाणे या जिल्हयातील ७५ पथदर्शी ग्रामपंचायतींची निवड करुन त्यातून आलेले अनुभव, अडचणी विचारात घेऊन व त्यापासून बोध घेऊन २००४ मध्ये राज्यातील २६ जिल्हयांसाठी जलस्वराज्य प्रकल्प मंजूर करण्यात आला. त्यामध्ये

एकूण ३०४४ ग्रामपंचायतींचा समावेश आहे. एकूण आराखडा १३९५.५२ कोटी रकमेचा आहे. सदर ग्रामपंचायतींमधील ११.२२ लाख कुटुंबांना, त्यातील ९७.९६ लाख ग्रामीण व आदीवासी जनतेला पाणी व स्वच्छतेच्या थेट सुविधा जलस्वराज्य प्रकल्पामुळे उपलब्ध होणार आहेत.''५

### अ) पुणे विभागातील जलस्वराज्य प्रकल्प :

पुणे विभागात पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर या पाच जिल्हयांचा समावेश होतो. पाच जिल्हयापैकी पुणे जिल्हा वगळता इतर चार जिल्हयात जलस्वराज्य प्रकल्प सुरु आहे. त्यामध्ये एकूण ४८२ ग्रामपंचायतींचा समावेश आहे.

पुणे जिल्हात 'आपलं पाणी' हा जर्मन शासन ( KFW BANK ) अर्थसहाय्यीत प्रकल्प सुरु आहे.

### ब) कोल्हापूर जिल्हयातील जलस्वराज्य प्रकल्प :

कोल्हापूर जिल्हयाची लोकसंख्या ३२,१२,४१३ इतकी असून ७,६८५ चौ.कि.मी. भौगोलिक क्षेत्रात विस्तारलेल्या १२ तालुक्यांमध्ये १०२९ ग्रामपंचायतींचा समावेश होतो. जलस्वराज्य प्रकल्पात त्यापैकी ११५ ग्रामपंचायतींची निवड करण्यात आली आहे. जूलै २००४ मध्ये पहिल्या टप्प्यात २३ तर सप्टेंबर २००५ मध्ये दुसऱ्या टप्प्यात ९२ गावांची निवड करण्यात आली. ''११५ ग्रामपंचायतींसाठी ६७९९.०८ लाख रु. पाणीपुरवठा व स्वच्छता सुविधांसाठी, २६९.७७ लाख क्षमता बांधणीसाठी व १२७.९४ लाख महिला सक्षमीकरणासाठी प्राप्त झाले आहेत.''६ त्याचा लाभ एकूण ३,५१,२०५ लोकांना मिळणार आहे. सद्यस्थितीत ११५ ग्रामपंचायतींपैकी १०७ ग्रामपंचायतींमध्ये पाणीपुरवठा सुरु आहे. ८ ग्रामपंचायतींमधील कामे प्रगतीपथावर आहेत. ७१ ग्रामपंचायतींमधील प्रकल्पाची सर्व कामे पूर्ण होऊन, गावात बर्हिगमन प्रक्रिया राबविण्यात आली आहे. प्रकल्प ग्रामपंचायतींकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे.

## १.९ सहाय्यकारी संस्थांची नियुक्ती व जबाबदारी :

ग्रामस्थांना प्रकल्प तयार करु न राबविण्यास मदत करण्यासाठी ५ ते १० ग्रामपंचायतींसाठी एक सेवाभावी संस्था नियुक्त करण्यात येते. सहाय्यकारी संस्थाची यादी जिल्हा परिषद शासनाच्या मान्यतेनुसार तयार करते. अशा यादीमधून हव्या असलेल्या संस्थेची निवड महिला व सर्वसाधारण सभेच्या मंजूरीने केली जाते. सेवाभावी संस्थांची निवड योग्य प्रकारे झाली आहे किंवा नाही याची संपूर्ण जबाबदारी जिल्हा परिषद यंत्रणेची असते.

सहाय्यकारी संस्थेची भूमिका :-

१) प्रकल्पासंबंधी माहितीचा प्रसार करणे.

२) गावकऱ्यांचे संघटन व समित्यांची स्थापना करण्यात पुढाकार घेणे.

३) स्वच्छता व पाणी पुरवठयाच्या सद्यस्थितीचे अवलोकन करुन सहभागी मूल्यांकन प्रक्रियेला चालना देणे.

४) गाव कृतीआराखडा तयार करण्यासाठी सर्व सहभागाने तयारी करणे.

५) महिला सक्षमीकरण या उपप्रकल्पाचा विकास करणे.

६) अमंलबजावणी व देखभाल दुरुस्तीचे उपक्रम राबविणे.

७) देखरेख यंत्रणा उभारण्यासाठी मदत करणे.

८) आर्थिक व्यवस्थापन व रेकॉर्ड ठेवणे.

९) गावपातळीवर विविध प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे.

जलस्वराज्य प्रकल्प , जिल्हा परिषद, कोल्हापूर येथे पहिल्या टप्प्यात दोन सहाय्यकारी संस्थांची निवड करण्यात आली. दुसऱ्या टप्प्यात आठ सहाय्यकारी संस्था निवडण्यात आल्या.

## १.१० विकास म्हणजे काय ? विकासाची संकल्पना :

कोणताही सकारात्मक बदल म्हणजे विकास होय. Any positive change is called development."डॅनियल लर्नर या संवादतज्ञाने आपल्या Passing of traditional society या ग्रंथात सांगितले की, पारंपारिक समाजाचा अंत होऊन तो विकासाकडे झेपावण्यासाठी विकास संज्ञापनाची गरज आहे. विकासाचा संदेश लोकांना समजेल अशा भाषेत संवादाच्या विविध माध्यमातून सांगण्याची गरज आहे. विकास संज्ञापनाला १९४५ नंतर खऱ्या अर्थाने सुरवात झाली."७ कोणताही प्रकल्प यशस्वी होण्यासाठी विकासाचा संदेश जास्तीत जास्त लोकसंख्येपर्यंत पोहचणे गरजेचे असते. तरच विकासाची प्रक्रिया जलद घडते. विकास हा सर्वसमावेशक असला तर तो प्रकल्प यशस्वी होतो. विकासासाठी मुलभूत साधने निर्माण केल्याशिवाय विकास होत नाही. रोगराई, अस्वच्छता, आरोग्य, शिक्षण, पाणी, कृषी यासारख्या तिसऱ्या जगातील राष्ट्रांच्या समस्या सोडविण्यासाठी विकासाची संकल्पना तेथे विविध माध्यमांच्या मार्फत पोहचविणे आवश्यक आहे. विल्बर श्रॅम यांनी सांगितले की, लोकांचा सहभाग, विकासकामांचा पाठपुरावा, लोकांना बदलासाठी तयार करणे, जनमताची मशागत करणे, जनजागृती करणे यासाठी विकास संवादाची गरज आहे.

कुठलाही बदल होत असताना किंवा कुठलाही सकारात्मक बदल घडत असताना वेगवेगळ्या टप्प्यातून त्या बदलाला पूरक अशी वातावरणनिर्मिती करावी लागते. कुठलाही विकासाचा प्रकल्प संवादाचा आधार घेतल्याशिवाय यशस्वी होत नाही. एखादा विकासाचा प्रकल्प सुरु असेल तर तो काय आहे, त्याचे स्वरुप, गुणवत्ता, लाभ, हानी हे सर्व लोकांना सांगणे, पटवून देणे आवश्यक आहे. माहितीबरोबर शिक्षण देणे, प्रकल्पासंदर्भात जागृती करणे आवश्यक आहे.

जलस्वराज्य प्रकल्पात समाविष्ट करण्यात आलेली प्रशिक्षणे, कार्यशाळा यांच्या माध्यमातून शुद्ध पाणी, स्वच्छ गाव, स्वच्छतेच्या सुविधा, पाणीपुरवठा योजनेची

देखभाल दुरूस्ती, पाण्याचे योग्य नियोजन व व्यवस्थापन, महिला सक्षमीकरण इ. संदर्भात वारंवार ग्रामस्थांना मार्गदर्शन करण्यात आले. वर्तमानपत्रे, पोस्टर्स, घडीपत्रिका, पाम्प्लेट, मौखिक संवादाच्या माध्यमातून ग्रामस्थांना प्रकल्प समजावून सांगण्यात आला. महिला ग्रामसभा, सर्वसाधारण ग्रामसभा, तिन्ही समिती सभा, कोपरा सभा यांच्या माध्यमातून जलस्वराज्यतून होणाऱ्या विकासाचा संदेश लोकांपर्यत पोहचवण्याचे काम जिल्हा चमूने केले. विकासासाठी आवश्यक असणारा संदेश लोकांना त्यांच्या भाषेत समजावून सांगण्यात आला. त्यातून अधिकाधिक लोकसहभाग मिळवण्याचा प्रयत्न करण्यात आला.

"१९४४ साली स्थापन झालेली जागतिक बॅक मागास, गरीब, तिसऱ्या जगातील राष्ट्रांच्या विकासासाठी काम करते. जी राष्ट्रे गरीब, मागास आहेत त्यांचे प्रश्न सोडवून त्यांच्या क्षमतांचा विकास करणे, आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, पाणी अशा क्षेत्रांमध्ये सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रातील लोकांची मदत घेऊन कार्य करणे हे जागतिक बॅकेचे प्रमुख उद्दीष्ट आहे."८ जलस्वराज्य प्रकल्प हा जागतिक बॅक अर्थसहाय्यीत प्रकल्प असल्यामुळे ग्रामीण भागातील पाणीटंचाईचा प्रश्न संपून तेथे विकास साधावा, शुद्ध व पुरेसे पाणी, स्वच्छतेच्या सुविधा, महिला सक्षमीकरण याद्वारे ग्रामीण भागाचा विकास व्हावा हे उद्दीष्ट साध्य करण्यासाठी प्रकल्पाची रचना करण्यात आली आहे. उद्दीष्टांच्या पूर्ततेसाठी संपूर्ण यंत्रणा कार्यरत आहे.

## १.११ विकासासाठी लोकसहभागाची आवश्यकता :

शासनाने लोकांच्या विकासासाठी अनेक कल्याणकारी योजना आखल्या. परंतु लोकांना या योजनांमध्ये सहभागी करुन न घेतल्यामुळे लोकांना त्या कधीच आपल्या किंवा आपल्यासाठी आहेत असे वाटले नाही. आपलेपणाच्या अभावामुळे योजना अयशस्वी होतात हे जेव्हा संशोधन व सर्व्हेक्षण याद्वारे शासनाच्या लक्षात आले तेव्हा जुन्या पुरवठा आधारीत धोरणाला पूर्णविराम देवून लोकसहभागावर आधारीत कार्यक्रमांचे आराखडे

आखण्यात यावेत असे धोरण शासनाने २७ जुलै २००० साली टरविले. आराखडा तयार करणे, सुविधांची निवड, मार्गदर्शक व तंत्रज्ञानाची निवड, निधीचा वापर या सर्व गोष्टी गावाने ठरवायच्या असे या नवीन धोरणानुसार ठरले. त्यानुसार ग्रामपंचायत ही केंद्रबिंदू ठरली तर ग्रामसभेला केंद्रस्थानी ठेवण्यात आले. महिलांच्या सहभागासाठी महिला ग्रामसभेचे विशेष आयोजन करण्याचे ठरले. लोकांना आपल्यालाही योजनेत सहभागी करुन घेतले आहे असे वाटावे यासाठी महिला व सर्वसाधारण ग्रामसभेची आणि लोकांमध्ये स्वमालकीची जाणीव व्हावी यासाठी लोकवर्गणीची संकल्पना आली. ग्रामस्थांनी सध्याच्या व भविष्यातील लोकसंख्येचा, देखभाल दुरुस्तीच्या खर्चाचा विचार करुन आवश्यक पाणीपुरवठा व स्वच्छता सुविधांचे नियोजन, अमंलबजावणी करायची. यामध्ये शासनाचा सहभाग तांत्रिक सहाय्य पुरविणे, निधी उपलब्ध करुन देणे, ग्रामस्थांना आवश्यक असणारे सहकार्य व मार्गदर्शन पुरविणे एवढाच ठेवला आहे. ग्रामस्थांची क्षमता बांधणी होण्यासाठी तसेच जलस्वराज्य प्रकल्प सविस्तरपणे समजण्यासाठी विविध कार्यक्रम व प्रशिक्षणांचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्याची आमंलबजावणी करण्याचे काम ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती आणि महिला विकास समिती करते. जिल्हा चमू त्यांना मार्गदर्शन करण्याचे काम करतो. त्यामुळेच लोकांचा पुढाकार त्यात शासनाचा सहभाग या धोरणानुसार कामाची अमंलबजावणी होत आहे.

प्रकल्पात कोणताही निर्णय घ्यायचा असेल तर त्यासाठी ग्रामसभेत ४०% लोकसहभागाची अट घातली आहे. ४०% पेक्षा कमी लोकसंख्या उपस्थित असेल तर ग्रामसभा रद्द करुन जोपर्यत ४०% उपस्थितीचा कोरम पूर्ण होत नाही तोपर्यत निर्णय घेतला जात नाही. त्यामुळे जलस्वराज्य प्रकल्पात कोणताही निर्णय घेण्यासाठी व त्याची अमंलबजावणी करण्यासाठी लोकसहभागाला महत्व असल्याचे दिसून येते. जलस्वराज्य प्रकल्पात लोकसहभागातून नळपाणीपुरवठा सुविधा आणि स्वच्छतेच्या माध्यमातून संपूर्ण ग्रामविकास अपेक्षित आहे. आमचा विकास आमच्या हाती या वाक्यातून लोकसहभाग हा विकासाचा अविभाज्य घटक असल्याचे लक्षात येते. लोकांचा पुढाकार त्यात शासनाचा

सहभाग या शासनाच्या नवीन धोरणाचे यश संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान, निर्मलग्राम, तंटामुक्ती गाव अभियान, शिवकालीन पाणी साठवण योजना, क्षेत्र सुधारणा पथदर्शी कार्यक्रम, आपलं पाणी, स्वजलधारा या योजनांच्या माध्यमातून दिसून आले आहे. जलस्वराज्य प्रकल्प त्यापैकीच एक आहे.

## १.१२ महिला सक्षमीकरण :

२००१ हे साल महिला सक्षमीकरण वर्षे म्हणून घोषित केले. महिला सक्षमीकरणासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. परंतु अजूनही महिला सक्षमीकरणाचा निट अर्थ लोकांना समजलेला नाही. महिलांच्या आर्थिक विकासाबरोबर त्यांचा सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, शारिरीक, मानसिक विकास महिला सक्षमीकरणामध्ये अपेक्षित आहे. वर्षानुवर्षे समाजाच्या जाचक बंधनात जखडलेल्या महिलांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांना विकासाच्या संधी उपलब्ध करून देणे, निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेणे, नेतृत्वाची संधी देणे या गोष्टींचा महिला सक्षमीकरणात समावेश होतो. महिला सक्षमीरकणात सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, शारिरीक, मानसिक व आर्थिक स्वातंत्र्य आणि स्वावलंबन महत्वाचे आहे. जलस्वराज्य प्रकल्पातील महिला सक्षमीकरणाचा मुख्य उद्देश जलव्यवस्थापन, स्वच्छता व सर्वांगिण ग्राम विकासामध्ये महिलांचा सहभाग वाढविणे हा आहे. गावातील महिलांनी संघटित होऊन स्वयं सहाय्यता बचत गट तयार करणे महत्वाचे आहे. सामाजिक व आर्थिक विकास होण्यासाठी महिलांनी पुढाकार घेऊन आपल्या आवडीच्या कामांमध्ये कौशल्य प्रशिक्षण घ्यावे म्हणजे त्याचा फायदा उद्योग व्यवसाय सुरु करण्यासाठी होईल हा अर्थ अभिप्रेत आहे. जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत उपलब्ध महिला सक्षमीकरण निधीचा वापर महिला विकास समितीच्या माध्यमातून स्वयं सहाय्यता गटातील महिला करु शकतात. तसेच या महिला इतर शासकीय व अशासकीय संस्थांमार्फत आर्थिक व तांत्रिक मदत घेऊ शकतात. उदा- स्टेट बॅंक ऑफ इंडिया, महिला आर्थिक विकास महामंडळ, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नाबार्ड इ.

## १.१३ उद्दीष्टचे :

१) जलस्वराज्य प्रकल्पातून विकास होतो किंवा नाही हे अभ्यासणे .

२) रेंदाळ गावच्या विकासातील लोकसहभागाचे महत्व अभ्यासणे.

३) रेंदाळ गावात जलस्वराज्य प्रकल्पातून महिलांचे सक्षमीकरण झाले आहे किंवा नाही हे तपासणे.

## १. १४ समारोप :

'जलस्वराज्य प्रकल्पातून विकास : रेंदाळ गावचा विशेष अभ्यास' या लघुप्रबंधातील पहिल्या प्रकरणामध्ये जलस्वराज्य प्रकल्प म्हणजे काय, उद्देश, स्वरुप, नियम, महाराष्ट्रातील जलस्वराज्य प्रकल्प, कोल्हापूर जिल्हयातील जलस्वराज्य प्रकल्प, विकास म्हणजे काय ? विकासासाठी लोकसहभागाची आवश्यकता, महिला सक्षमीकरण या विषयांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. दुसऱ्या प्रकरणात संशोधन पद्धतीचा, लघुप्रबंधाच्या अभ्यासासाठी वापरण्यात येणाऱ्या अभ्यास पद्धतींचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे.

# संदर्भसूची


१. जलस्वराज्य प्रकल्पाची माहितीपुस्तिका - पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन - पान नं. २

२. जलस्वराज्य प्रकल्पाची माहितीपुस्तिका - पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन - पान नं. ५

३. घडीपत्रिका - जलस्वराज्य प्रकल्प कार्यालय, जिल्हा परिषद, कोल्हापूर .

४. माहितीपत्रिका - जलस्वराज्य प्रकल्प कार्यालय, जिल्हा परिषद, कोल्हापूर .

५. Govt. Online C. P. R. System - RSPMU - Mumbai - 16th March 2009

६. डॉ. धारुरकर वि. ल. - विकास संवादाची नवी क्षितीजे - चैतन्य प्रकाशन, औरंगाबाद , २६ जानेवारी १९९९, पान नं. १३,१४

७. www.worldbank.org - website - 10/12/08